Vol III Issue VIII Feb 2014

Impact Factor : 2.2052(UIF)

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 2.2052(UIF)**

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-8 | Feb-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# व्यावहारिक उपयोजित मराठी अभ्यासक्रम : बदलत्या दिशा

**एकनाथ ढोणे**

सहयोगी प्राध्यापक,
रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर.

***सारांश :***

जीवनातील कोणत्याही क्षेत्रातील विद्या तीन स्तरावर कार्यरत असते. पहिला स्तर हा त्या विद्येच्या मुलभूत शास्त्रीय ज्ञानाचा असतो. दुसरा या ज्ञानावर आधारित संशोधन आणि नवनिर्मितीचा स्तर, तर तिसरा स्तर या विद्येच्या व्यावहारिक उपयोजनाचा ठरतो. विविध विद्याशाखेच्या विकासाचा आलेख पाहता या त्रिस्तरीय रचनेचे संतुलन राखणारे विषय संशोधन आणि विकासाचे नवनवीन टप्पे गाठणारे ठरले आहेत. मुलभूत संरचना (Basic Structure) संशोधन व विकास (Research & Development) उपयोजन (Application) या त्रिमितीय सूत्रावर आधारित वाटचाल करणारे विषय आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात स्वतःचे अस्तित्व ठामपणे टिकवू शकले आहेत. किंबहुना बदलत्या काळात अनेक क्षेत्रांची ही वस्तुस्थिती आहे हे नाकारता येत नाही. मग या बाबतीत भाषा अध्यापनाचे क्षेत्र कसे अपवाद ठरेल ?

***प्रस्तावना :***

जागतिक भाषाकुलातील समाविष्ट भाषांचा विचार करता वरील त्रिमितीय सूत्राचा अवलंब करणाऱ्या भाषा काळाच्या बदलत्या प्रवाहातही आजवर आपले अस्तित्व टिकवून आहेत. कोणतीही भाषा–शास्त्र,  साहित्य आणि उपयोजन या आधारेच विकसित होते व टिकून राहते. विशिष्ट भाषेच्या विकासासंबंधी व अस्तित्वाविषयी वरील सूत्राचा विचार हा प्रस्तुत लेखकाला महत्त्वाचा आणि अपरिहार्य वाटतो. मराठी भाषेच्या विकासासंबंधी व अस्तित्वाविषयी सुत्राचा विचार हा प्रस्तुत लेखकाला महत्वाचा आणि अपरिहार्य वाटतो. मराठी भाषेच्या विकासा संबंधी व अस्तित्वाविषयी होणाऱ्या विचारमंथनामध्ये या मुलभूत घटकांचा विचार होणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने काही मुद्दे या निबंधाात उपस्थित करावेसे वाटतात.

'व्यावहारिक मराठी' चा अभ्यासक्रम असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा यातील 'व्यवहार' या शब्दाचा विशिष्ट अर्थच आपण लक्षात घेतो. नितिनियमांनी युक्त समाजमान्य संकेताधिष्ठित वर्तन म्हणजे व्यवहार अशी साधारण व्याख्या आपण व्यवहार या शब्दाची करतो. म्हणजेच कोणत्याही विषयाचे व्यावहारिक स्वरूप हे समाजभिमुख व समाजोपयोगी असे वस्तुनिष्ठ वर्तनच ठरते. अभ्यासक्रमात 'मराठी' चा समावेश आहे असे आपण म्हणतो तेंव्हा प्रामुख्याने मराठी भाषा (व्याकरण) आणि मराठी साहित्य हा संदर्भ अभिप्रेत असतो. परंतु मराठीचे व्यावहारिक उपयोजन जाणून घेणे ही साहित्यसंपदा यांच्या अभ्यासाचे महत्त्व तर आहेच. परंतु आज बदलत्या काळात भाषेचा अभ्यास म्हणजे केवळ व्याकरण रचना व साहित्यविश्व इतकाच मर्यादित न राहता अनेकांगांनी व्यापक झालेला आहे. गेल्या चार–पाच दशकांमध्ये शेती, तंत्रज्ञान, विज्ञान, अर्थव्यवहार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध व्यवहार इ. अनेक क्षेत्रांमध्ये व्यवहाराचे माध्यम म्हणूनही भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होत आहे. शिक्षणाचे स्वरूप जेव्हा 'पुस्तकी' पदव्यांवर आधारलेले असते तेव्हा ती पदवी घेणारा स्नातक हा एकांगी बौध्दिकतेचे उदाहरण ठरतो हे गेल्या काही दशकांतील अभ्यासक्रमांनी सप्रमाण सिध्द झाले आहे. पदवीधरांना भाषेच्या व्यावहारिक उपयोजनात जेव्हा अनेकानेक अडचणी येतात तेव्हा भाषेच्या अभ्यासक्रमातील मर्यादांची जाणीव प्रकर्षाने होते. या मर्यादा 'इंग्रजी' सारख्या पाश्चात्य, भाषांकडून किंवा त्याच्या व्यावहारिक उपयोजनाने कमी होत नाहीत तर त्या अधिक गुंतागुंत निर्माण करतात ही देखिल वस्तुस्थिती आहे. तेव्हा समाजजीवनातील विविध वस्तुनिष्ठ गरजांची जाणीव ठेवून तशा प्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे. यादृष्टीने विद्यापीठ पातळीवर

'व्यावहारिक मराठी' चा अभ्यासक्रम सुरू झाला. कला, वाणिज्य, आणि विज्ञान इ. विद्याशाखासाठी या अभ्यासक्रमाचे नियोजन विविध विद्यापीठांनी केले. मात्र या अभ्यासक्रमांमध्ये वेळोवेळी काळानुरूप बदल न केल्याने त्याला साचेबंदपणा प्राप्त झाला आहे. परिणामी, विद्यार्थी व शिक्षक या दोन्ही घटकांची या अभ्यासक्रमाकडे गौणत्त्वाने पाहण्याची वृत्ती वाढत गेली. आज केवळ एक पर्यायी विषय म्हणून तो विद्यापीठांकडून शिकविला आणि शिकला जातो. ही निश्चितच चिंतनीय बाब आहे.

'व्यावहारिक मराठी' या अभ्यासक्रमाकडे ज्या दुय्यमत्वाच्या भूमिकेतून पाहिले जाते. त्याचा विचार करता जागतिक स्तरावरील काही भाषांचे व्यावहारिक स्वरूप पाहाणे निश्चित उपकारक ठरेल. त्याद्वारे 'मराठी' च्या भवितव्याविषयी, अस्तित्वाविषयी, विकासाविषयी, आपणाला सतावणाऱ्या काही प्रश्नांची दिशाही स्पष्ट होऊ शकेल. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इ. अनेक पाश्चात्य भाषांचे जगावरील वर्चस्व आज आम्हां आशियायी, पौर्वात्य देशांना अपरिहार्यपणे मान्य करावे लागते आहे. विशेषतः इंग्रजीच्या संदर्भात हे सत्य नाकारता येत नाही. याची कारणमीमांसा शोधू जाता पहिल्यांदा जाणवते ते म्हणजे गेल्या पाच–सहा शतकामध्ये ब्रिटिशांनी अनेक कारणांसाठी त्यांच्या'भाषेचा केलेला वस्तुनिष्ठ व अत्यंत लवचिक असा व्यावहारिक वापर होय. इंग्रजीचा भाषाशास्त्र आणि साहित्यसृजनाचा इतिहास, प्राचीन तसेच संपन्न आहे याविषयी दुमत असण्याचे काहीच कारण नाही. त्याचबरोबर औद्योगिक क्रांतीनंतर ब्रिटीशांचे वसाहतवादाचे धोरण जसजसे विकसित व यशस्वी होत गेले तसतसा त्यांनी इंग्रजीचा व्यावहारिक दृष्टीने केलेला अप्रतिम वापरही लक्षात घेण्यासारखा आहे. इंग्रजीला प्राप्त झालेला 'जागतिक भाषेचा दर्जा' हा तिच्या लवचिक उपयोजिकतेमुळे झाला आहे. साहित्यातील इंग्रजी व दैनंदिन व्यवहारातील इंग्रजी यांतील फरक सहज जाणवतो. वसाहतींचा कारभार सुयोग्य व कार्यक्षमरीत्या चालवा, स्थानिक रहिवाशांशी व्यवहारसौख्य प्रस्तावित व्हावे, तेथील राजकारण, धर्म, संस्कृती, इतिहास, भूगोल, इतर शास्त्रांचा योग्य अभ्यास करता यावा यासाठी स्वभाषेच्या ताठर दुराभिमान न बाळगता इंग्रजांनी इंग्रजीचा अत्यंत लवचिक वापर केला. राज्यकारभारासाठी उपयुक्त असा 'कारकून' वर्ग जगभर तयार करता यावा यासाठी वेगवेगळया देशांमध्ये उपयुक्त ठरतील असे (English parspecial purpose) इ.एस.पी. चे अभ्यासक्रम तयार केले. भाषेच्या व्यावहारिक उपयोजनासाठी केले गेलेले हे जाणिवपूर्वक प्रयत्न आज आपल्यासाठीही मार्गदर्शक आहेत. स्वातंत्र्योतर काळात भारतीय विद्यापीठांकडून असे दूरदृष्टीचे प्रयत्न जाणीवपूर्वकतेने झाल्याचे आढळत नाहीत. हे विशेष आजही जगभर 'इंग्रजीच्या' व्यावहारिक किंवा उपयोजित अभ्यासक्रमांचे प्रयत्न पूर्वीपेक्षाही जोमाने सुरू आहेत. महाराष्ट्रात अशा झटपट इंग्रजी

शिकविणारे शोकडो वर्ग चालतात यातच सर्व काही आले. या प्रकारच्या अभ्यासवर्गांना असणारी उपस्थितीही दिवसेंदिवस लक्षणीय आहे. मात्र गेल्या चाळीस वर्षामध्ये आपण मराठीच्या संदर्भात व्यवहारिक मराठीचा ठराविक साचेबंद आणि पर्यायी अभ्यासक्रम चालविण्यापलिकडे प्रयत्न केले नाहीत हे सत्य आहे. इंग्रजीची जी स्थिती आहे तिच थोड्या बहुत फरकाने फ्रेंच, रशियन जर्मन इ. अनेक भाषांची स्थिती आहे. या भाषांचा इथे उल्लेख करण्याचा उददेश एवढाच की, या भाषांचा त्या त्या देशाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणांशी असलेला सहसंबंध लक्षात आणून देणे. या पार्श्वभूमीवर 'मराठी' चा विचार करता स्पष्टपणे जाणवते की आपण मराठीच्या 'व्यावहारिक' स्वरूपाला नेहमीच गौण मानत आलो आहोत.

'व्यवहार' म्हणजे काय ते आपण सुरूवातीला स्पष्ट केले आहे. मानवी जीवनव्यवहाराला कोणतीच मर्यादा नसते. त्यात नेहमीच काळानुरूप बदल घडत असतात. या बदलांमधून नवनवीन समस्या निर्माण होत असतात. त्यांचे निराकारण करण्याचा प्रयत्न व्यक्ती सातत्याने करीत असते. अर्थात व्यक्ती ही समाजाचा अविभाज्य घटक आहे. सामाजिक जीवन सुखकर करण्याचे प्रभावी संप्रेषण साधन म्हणून भाषा कार्यारत असते. व्यक्ती एकटी असो किंवा सहजीवनात असो तिची विचार प्रक्रिया भाषेतूनच व सुरू असते. श्रवण, वाचन, लेखन, भाषण हे भाषेद्वाराच अस्तित्वात येते. तात्पर्य, समाजाच्या धारणेचे प्रमुख साधन म्हणून, 'भाषा' महत्वाची ठरते. व्यक्ति आपले सामाजिक व्यक्तिगत, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय व्यवहार भाषेच्या माध्यमातूनच पूर्ण करीत असते. भाषण, श्रवण, वाचन, लेखन इ. कौशल्ये शालेय स्तरावरील मराठीच्या अभ्यासक्रमास शिकविली जातात. पण समाजजीवनात दैनंदिन व्यवहार सुरळीतपणे व्हावेत, त्यात सुसंगती असावी याकरिता कार्य करणारी भाषा स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून निर्माण झाली पाहिजे ही काळाची गरज आहे.

या दृष्टीने व्यावहारिक मराठीच्या अभ्यासक्रमाचे अध्यापन करीत असताना जी उदिदष्टे निश्चित केली गेली त्याचा उल्लेख येथे करणे उचित ठरेल. विविध क्षेत्रातील संज्ञापनात भाषेची भूमिका स्पष्ट करणे, विविध अविष्काराचे स्वरूप, समजावून घेणे, त्या व्यवहारक्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या भाषिक कौशल्यांचा क्षमतांचा विकास करणे. भाषिक कौशल्ये आणि संपर्कमाध्यमे यांचा परस्परसंबंध समजावून घेणे व कौशल्यांचे प्रत्यक्ष उपयोजन करणे. ज्या व्यवहारक्षेत्रांमध्ये मराठीचा वापर होत नाही. त्या क्षेत्रांसाठी मराठीचा वापर करण्याची क्षमता विकसित करणे. कार्यालयीन, व्यावसायिक कामकाजात होणारा वापर, गरज व स्वरूपाविशेष इ. ची माहिती करून घेणे. या व्यवहारांसाठी आवश्यक लेखन कौशल्यांचे संपादन व उपयोजन करणे. व्यवहार भाषेस ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती देणे. विविध ज्ञानशाखांसाठी पारिभाषिक शब्दांची निर्मिती करून त्यांचे उपयोजन करणे. अशा अनेक उदि्दष्टांना समोर ठेवून व्यावहारिक मराठीच्या अभ्यासक्रमाचे नियोजन व अध्यापन झाले पाहिजे. गेल्या अनेक वर्षापासून 'व्यावहारिक मराठी' चा तोच तो अभ्यासक्रम आपण शिकवितो आणि शिकतो आहोत. हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे. आजही विविध ज्ञानशाखा उदा. विधी, वैद्यकिय, अर्थशास्त्रीय वगैरेसाठी आपण पारिभाषिक संज्ञाचा कोश स्वतंत्रपणे निर्माण केलेले नाहीत. या विविध शषांमध्ये मराठीचे विविधांगी उपयोजन करण्याविषयी विद्यापीठे शिक्षक किंवा सामान्य मराठी भाषिक म्हणून आपण उदासीन आहोत.

व्यावहारिक मराठीच्या उपयोजनाची जी विविध क्षेत्रे आहेत त्यामध्ये प्रसारमाध्यमे, शासकीय कामकाज जाहिरातीचे क्षेत्र इ. समावेश आज प्रामुख्याने आहे. परंतु या क्षेत्रातील केला जाणारा मराठीचा वापर हा दुर्देवाने चिंतनीय पातळीवरचा आहे. उदा. दूरदर्शन वरील मराठी जाहिराती, निवेदने, वृत्तसंपादन, विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमामधील सूत्रसंचालकांचे मराठी विषयीचे बुध्दि्दारिद्रय पाहिल्यास या विषयाच्या वाटयाला आलेली उपेक्षाच तीव्रतेने जाणवते. आज आम्ही पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याच्या निर्णयाने थाळया बडवून कौतूक करतो आहोत. व्यावहारिक मराठीचे धडे मात्र वि़द्यापीठ पातळीवर 'पर्यायी' किंवा 'ऐच्छिक' स्वरूपाचा शंभर गुणांचा अभ्यासक्रम म्हणूनच शिकवित आहोत. मराठी माध्यमातून शिकणारा किंवा मराठी विषय घेऊन पदवी मिळविणारा विद्यार्थी या परिस्थितीमध्ये मागे पडल्यास त्यात नवल नाही. त्याच्या संबंधित विषयांतील पदवीबरोबरच 'सुशिक्षित बेरोजगार' ही सहपदवीही आमचे विद्यार्थी प्राप्त करीत आहेत. व्यावहारिक मराठी किंवा उपयोजित मराठी अभ्यासक्रम हा अधिक समाजाभिमुख होऊन रोजगाराच्या संधी आमच्या युवापिढीला मिळवून देऊ शकतो याचे भान विद्यापीठीय अभ्यासमंडळांना आता यायला हवे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात होऊन दोन दशकांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. या प्रक्रियेने केवळ व्यवसाय—उद्योगांची क्षेत्रेच नव्हेत तर सामाजिक सांस्कृतिक जीवन व्यवहार ही आपल्या कवेत घेतले आहेत. प्रत्येक देशाला या प्रक्रियेच्या आव्हानांना सामोरे जाणे भाग आहे. वेळीच योग्य त्या बदलांसह ही आव्हाने ज्या विकसनशील राष्ट्रांनी स्वीकारी आहेत. त्याचा योग्य निभाव भविष्यकाळात लागेल. या रणधुमाळीत महाराष्ट्रीय समाजाचे व मराठीचे अस्तित्व टिकविण्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत. मग त्यात अध्यापक अध्यापनपध्दती टाळून कसे चालेल. वाढत्या सामाजिक व्यवहारात अनेक व्यवहारक्षेत्रे आपल्या जीवनाला स्पर्श करीत आहेत. माहिती—तंत्रानाचे महाजाल झपाटयाने जगातील दूरत्वाच्या भिंती ढासळून टाकत आहे. अशा स्थितीत पारंपारिक अभ्यासक्रमांचे अध्यापन करण्याबरोबर नवीन दिशांना सामोरे जाण्यासाठी या सर्व व्यवहारासाठी 'मराठी' मातृभाषा म्हणून व उपयोजित भाषा म्हणून सक्षम बनविणे गरजेचे आहे. वेगवेगळी विकसित राष्ट्रे भारताकडे आपली बाजारपेठ म्हणून तर अविकसित अथ्वा विकसनशील राष्ट्रे आधार म्हणुन पहात आहेत. या राष्ट्रांशी अनेक क्षेत्रात परस्परसंबंध प्रस्तापित करण्यामध्ये उपयोजित भाषा म्हणून मराठीचा सहभाग हा अनेकार्थांनी मुलभूत व महत्वपूर्ण ठरेल. केवळ भाषेच्याच नव्हे तर समाजविकासाच्या दृष्टीनेही ते हिताचे ठरेल. दुसऱ्या एक दृष्टीने 'व्यावहारिक मराठी' च्या अध्यापनाकडे गांभीर्याने पाहाणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाचा भाग म्हणून काही करारांनुसार विदेशातील प्रगत विद्यापीठांना भारतात विद्यापीठे उघडण्यास परवानगी देण्यात आली. पुण्यात अशा प्रकाच्या उपक्रम सुरू झाला आहे. या विद्यापीठातील तज्ज्ञ अध्यापक प्रगत व लवाचिक, अभ्यासक्रम, यथोचित सामग्री, प्रायोगशाळा, ग्रंथालये, माहिती तंत्रज्ञानाची उपयोजित सामग्री इ. मुळे आपल्यासमोर गुंतागुंतीचे आव्हान उभे टाकले आहे. उद्या चीन, जपान, कोरीया, अमेरिका या देशांमध्ये तयार झालेल्या 'व्यावहारिक मराठी अभ्यासक्रमाच्या' सीडीज् महाराष्ट्रातील वि़द्यार्थ्यांना मराठीचे अध्यापन करतील तेव्हा केवळ भाषा अध्यापनाचाच नव्हे तर अध्यापकांच्या भवितव्याचाही प्रश्न निर्माण होईल. या संदर्भाने विचार करता केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात आणि भारताबाहेरही 'व्यावहारिक मराठी' च्या अध्यापनाचे कार्य चालविणे ही बदलाची नवी दिशा आहे. यात भाषेच्या विकासाची व युवापिढीसाठी रोजगारांची संधी आहे. सामान्य मराठी माणसाच्या बहुउददेशीय विकासाचा हा पाया ठरू शकेल.

एका निबंधात प्रस्तुत विषयाची सर्वांगीण व्याप्ती साकार करणे शक्य होणार नाही. या मर्यादेची प्रस्तुत लेखकाला जाणीव आहे. मात्र साररूपाने काही निरीक्षणे नोंदविण्याचा प्रयत्न करता येईल. मराठी चे अध्यापन (मग ते भाषाशास्त्राचे, साहित्याचे किंवा उपयोजित मराठीचे असो ) करणे हे एक स्वतंत्र आव्हान आहे. बदलत्या काळानुसार आवश्यक त्या बदलांसह ते स्वीकारणे अध्यापक म्हणून आपल्या सर्वांचे ते कर्तव्य आहे. त्यातूनच मराठीचा जाणिवपूर्वक विकासही घडेल. व्यावहारिक मराठीचा जाणीवपूर्वक विकासही घडेल. व्यावहारिक मराठीचा अभ्यासक्रम, विशेष स्तर आणि सामान्यस्तरावर पदवीसाठी अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांना प्र्यायी न ठेवता आवश्यक अभ्यासकम म्हणून ठेवल्यास विषयाकडे पाहण्याची वृत्ती बदलेल. त्याचबरोबर विद्यापीठ पातळीवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांसाठीचे अभ्यासक्रम तयार करून जागतिक पातळीवर त्याचे अध्यापन होण्यासाठी प्रयत्न करणे या अभ्यासक्रमाच्या वेबसाईटस, प्रकल्प अध्यापकांनी हाती घेणे, महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांसाठी प्रात्याक्षिकांसह हा अभ्यासक्रम राबविणे योग्य ठरेल. मराठीतील साहित्यिक भावभिव्यक्ती प्रमाणेच विविध क्षेत्रांच्या परस्परसंबंधामध्ये संज्ञापन — माध्यम म्हणून अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य मराठीमध्ये निश्चितच आहे.

सरांशाने असे म्हणता येईल की, व्यावहारिक मराठीचा अभ्यासक्रम बदलत्या काळाशी सुसंगतपणे वाटचाल करण्यास आणि स्वभाषा व महाराष्ट्राचा विकास साधण्यास सक्षम आहे. या भूमिकेतून या अभ्यासक्रमाचे नियोजन व अध्यापन करणे हे आव्हान अध्यापनांची स्वीकारले पाहिजे.

***संदर्भ :***

1. व्यावहारिक मराठी — ल. रा. नसिरावारकर.
2. सामाजिक भाषाविज्ञान, डॉ. प्रभाकर जोशी, प्रा. चारूता गोखले.
3. अधुनिक भाषाविज्ञान : सिध्दांत, उपयोजन — डॉ. रविंद्र मालसे.
4. वर्णनात्मक भाषाविज्ञान — डॉ. लिला गोविलकर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net